जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2026
पुढारी

# महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. आर.के. कामत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. अजित कोळेकर, डॉ. सोमनाथ पवार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2026
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात राष्ट्रपिता महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते गांधीजी, शास्त्रीजी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुखदेव उंदरे, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. अजित कोळेकर, डॉ. सोमनाथ पवार, शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2026

जनप्रवास

# म. गांधी, लालबहादूर शास्त्री यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले. सकाळी शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. राजनीश कामत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. अजित कोळेकर, डॉ. सोमनाथ पवार आदींसह शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

03 OCT 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गांधीवादी शिक्षणपद्धती आजच्या शिक्षण व्यवस्थेला पर्याय

## ज्येष्ठ विचारवंत किशोर बेळकिहाळ; शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातर्फे परिसंवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महात्मा गांधींची शिक्षणपद्धती आजच्या शिक्षण व्यवस्थेला पर्यायी व्यवस्था ठरू शकते. श्रम, हस्तकौशल्य व जीवनोपयोगी शिक्षणाला प्राधान्य देणारी गांधीजींची 'नई तालीम' आजच्या काळातही महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेळकिहाळ यांनी केले.



**कोल्हापूर : ऑनलाईन परिसंवादात बोलताना ज्येष्ठ विचारवंत किशोर बेळकिहाळ.**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने महात्मा गांधी जयंतीनिमित्त 'महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर विशेष ऑनलाईन परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राच्या संचालक डॉ. प्रतिमा पाटणकर होत्या. बेळकिहाळ म्हणाले, गांधीजींनी शिक्षणाला श्रमाची जोड दिली. शिकतानाच नवीन कौशल्ये आत्मसात करून जीवनोपयोगी शिक्षण घेण्यावर त्यांनी भर दिला. शिक्षणाच्या प्रवाहात हस्तकौशल्याला त्यांनी विशेष महत्त्व दिले.

डॉ. भारती पाटील यांनी गांधीजींच्या 'नई तालीम'चे तत्त्वज्ञान समजून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. स्वराज्याचा लढा आणि नवभारताचे स्वप्न या शिक्षणपद्धतीमागे होते. तंत्रज्ञान आणि माणूस यांच्यातील द्वंद्वातून बाहेर पडण्यासाठी नई तालीम पर्याय ठरू शकते, असे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय भाषणात डॉ. पाटणकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात गांधीजींच्या विचारांचे प्रतिबिंब दिसत असल्याचे सांगितले. कौशल्याधारित शिक्षण, अनुभवातून शिक्षण आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ही त्याची वैशिष्ट्ये असल्याचे त्यांनी नमूद केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2026
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात एकल वापराच्या प्लास्टिकला बंदी

## उपाहारगृह, मेस, स्नॅक्स सेंटरसह सर्व विभागांना निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठ परिसरात एकल वापराच्या प्लास्टिक वस्तूंच्या वापरावर प्रतिबंध घातला आहे. याबाबत ३० सप्टेंबरला अधिकृत परिपत्रक जारी केले असून, विद्यापीठातील सर्व विभाग, कार्यालये, उपाहारगृहे, स्नॅक्स सेंटर, मेस आणि खाद्य केंद्रांना प्लास्टिकचा वापर टाळण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

**३०**
सप्टेंबरला अधिकृत परिपत्रक जारी करण्यात आले.

विद्यापीठ परिसर प्लास्टिकमुक्त करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार एकदा वापरून फेकून दिल्या जाणाऱ्या विविध प्लास्टिक वस्तूंची खरेदी, वापर आणि वितरण रोखण्याची जबाबदारी संबंधित विभागांवर सोपविली आहे. याशिवाय १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिकच्या कॅरीबॅगचा वापर टाळण्याचे निर्देश दिले आहेत. त्याऐवजी पर्यावरणपूरक पर्याय म्हणून नॉन-वुव्हन बॅगच्या वापराबाबत सूचना केली आहे. प्लास्टिकच्या वस्तूंची खरेदीच होऊ नये, यासाठी संबंधित कर्मचारी आणि व्यवस्थापनांनी खबरदारी घ्यावी, असेही परिपत्रकात नमूद केले आहे. शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीही एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर टाळावा, याबाबत जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्लास्टिक पॅकेजिंग बाजारात आणणाऱ्या उत्पादकांनीही त्याचे संकलन आणि योग्य पद्धतीने निपटारा करण्याची जबाबदारी पार पाडणे अपेक्षित आहे, असे म्हटले आहे.

### 'या' वस्तूंच्या वापरावर प्रतिबंध

ईयर बड्स, प्लास्टिकच्या पिशव्या, फुगे, कँडी व आईस्क्रीमसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या काड्या, प्लास्टिक स्टिरर्स तसेच प्लास्टिक प्लेट, कप, ग्लास, चमचे, काटे आणि चाकू



### उपाहारगृह आणि मेस चालकांवरही जबाबदारी

विद्यापीठातील सर्व उपाहारगृहे, स्नॅक्स सेंटर, मेस आणि खाद्य केंद्रांमध्ये एकल वापराच्या प्लास्टिक वस्तू वापरल्या जाणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2026
सकाळ

# एकल वापराच्या प्लास्टिकवर विद्यापीठ कॅम्पसमध्ये बंदी

## प्रशासनाकडून उपहारगृहे, अधिविभागांना सूचना

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने कॅम्पसमध्ये एकल वापराच्या प्लास्टिक वस्तूंच्या वापरावर बंदी घातली आहे. त्याबाबत प्रशासनाने उपाहारगृहे, मेस, अधिविभागांना सूचना केली आहे. या स्वरूपातील प्लास्टिक सापडल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

केंद्र, राज्य शासनाने प्लास्टिक कचऱ्यामुळे होणारे पर्यावरणीय प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने प्लास्टिक, थर्मोकोलच्या विविध वस्तूंच्या उत्पादन, वापर, साठवणूक, वितरण आणि विक्रीवर निर्बंध लागू केले आहेत. शासनाने एकल वापराच्या प्लास्टिकच्या विविध वस्तूंवर बंदी लागू केली आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठ कॅम्पस प्लास्टिकमुक्त, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी या प्लास्टिक वापरावर बंदी घातली आहे. याअंतर्गत प्लास्टिकच्या काड्या असलेले इअर बड्स, फुगे-कँडी आणि

> या प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाकडून वेळोवेळी पाहणी करण्यात येईल. प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंचा वापर आढळल्यास शासन नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.
>
> - **डॉ. व्ही. एन. शिंदे,** कुलसचिव

आइस्क्रीमसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या काड्या, प्लास्टिकचे झेंडे, प्लेट्स, कप, ग्लास, चमचे, काटे, ट्रे, स्ट्रॉ, सजावटीसाठी वापरण्यात येणारे पॉलिस्टायरीन, थर्मोकोल आणि शंभर मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे प्लास्टिक अथवा पीव्हीसी बॅनर्स आदींचा वापर करता येणार नाही. याबाबतच्या नियमांचे पालन विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, सेवक, कार्यक्रम आयोजक, सेवा पुरवठादार, कंझ्युमर्स स्टोअर्स, विभाग, अधिविभाग, कार्यालये, मेस, उपाहारगृहे, स्नॅक्स स्पॉट चालकांनी करावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2026

जनप्रवास

# विद्यापीठ परिसर प्लास्टिकमुक्त होणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी विद्यापीठात प्लास्टिकच्या वस्तू वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. विद्यापीठ परिसरात प्लास्टिकच्या काड्या, फुगे, कँडी, झेंडे, प्लेटस्, कप, ग्लास, चमचे, सुर्या, ट्रे, स्ट्रॉ आदी वस्तू वापरण्यास मनाई केली आहे. त्यामुळे विद्यापीठ परिसर प्लास्टिकमुक्त केला जाणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या सहिने प्रसिध्द केली आहे. प्रसिध्दीपत्रकात म्हंटले आहे, याचे संबंधितांनी कडक पालन करावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2026
पुढारी

# युवा महोत्सवात शहाजी लॉ कॉलेजचे यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवात शहाजी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाला सर्वसाधारण विजेतेपदासह चषकही मिळवून दिला. एकपात्री अभिनय, मराठी वक्तृत्व, इंग्रजी वक्तृत्व आणि हिंदी वक्तृत्व या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला. वादविवादात द्वितीय, प्रश्नमंजुषा व भारतीय समूहगीतामध्ये तृतीय, पथनाट्यात चौथा, तर एकांकिकेत पाचवा क्रमांक मिळविला.